Impact Factor-8.575 (SJIF) ISSN-2278-9308

# B.Aadhar

## Single Blind Peer-Reviewed & Refreed Indexed

## Multidisciplinary International Research Journal

January-2023

(CCCLXXXVI) 386(E)

**NATIONAL EDUCATION POLICY 2020**

**QUALITY ENHANCEMENT IN HIGHER EDUCATION**



**Chief Editor**
Prof. Virag S. Gawande
Director
Aadhar Social
Research & Development
Training Institute Amravati

**Editor**
Dr. Vilas Aghav
Officiating Principal
Associate Professor & Head
Department of Political Science.
Adarsh Mahavidyalaya, Hingoli Dist. Hingoli

B.Aadhar

This Journal is indexed in :
- Scientific Journal Impact Factor (SJIF)
- Cosmos Impact Factor (CIF)
- International Impact Factor Services (IIFS)

For Details Visit To : www.aadharsocial.com

Aadhar Publications

PRINCIPAL
Shivaji College
Hingoli, Dist. Hingoli

| | | |
|---|---|---|
| 23 | Study of e-Commerce and overview of positive or negative impact of covid-19 on e-Commerce products. **Shinde Ashvini Narayan** | 83 |
| 24 | Historical Study Of Impact Of Social Media On Youth **Vanashri Vitthalrao Solanke** | 86 |
| 25 | New Trends of Artificial Intelligence for Student Education **Ashwini Dinkar Ghuge, Pallavi Sunil Budruk** | 89 |
| 26 | Nep 2020: Need For Multidisciplinary Education **Aditi Rajesh Jawale** | 97 |
| 27 | Importance of Indian Higher Education in new Education Policy **Dhanashri Bhagwan Bhutada** | 99 |
| 28 | A Critical Studyof NEP 2020: Issues, Approaches Challenges, Opportunities, andCriticism. **Waghmare N. V.** | 104 |
| 29 | Open and Distance learning **Rohini R Jadhav. And Rajlaxmi R Almulwar** | 109 |
| 30 | Self-Employment Education and Entrepreneurship in NEP - 2020 **Dr.Ashish B. Gattani** | 112 |
| 31 | नवीन शैक्षणिक धोरण -२०२० आणि त्या समोरील आव्हाने डॉ. अर्चना दादाराव पोले | 114 |
| 32 | नव्या शैक्षणिक धोरणाची विश्लेषणात्मक चिकित्सा डॉ. विलास आघाव | 119 |
| 33 | महिला सक्षमीकरण - एक अभ्यास **Dr. Kalpana Manikrao Kadam** | 127 |
| 34 | नवीन राष्ट्रीय शैक्षणिक धोरण : संधी आणी आव्हाणे डॉ.सुखनंदन ढाले | 131 |
| 35 | भारतीय शिक्षण आणि शैक्षणिक धोरण : एक अभ्यास प्रा.डॉ. देविदास ग्यानुजी नरवाडे | 137 |
| 36 | राष्ट्रीय शैक्षणिक धोरण 2020: एक मुक्त चिंतन सचिन प्रल्हादराव हाटकर | 143 |
| 37 | नवीन राष्ट्रीय शैक्षणिक धोरण 2020 च्या शालेय शिक्षण धोरणातील काही महत्त्वपूर्ण बदलांचा परामर्श. डॉ.केशव गोपीनाथराव सारंग | 146 |
| 38 | नवीन शैक्षणिक धोरण व आव्हाने एक चिकित्सा डॉ.आकाश शेषराव बांगर | 149 |


PRINCIPAL
Shivaji College
Hingoli. Dist. Hingoli

Peer-Reviewed & Refereed Indexed Multidisciplinary International Research Journal

Impact Factor -(SJIF) –8.575, Issue NO, (CCCLXXXVI) 386 -E

ISSN : 2278-93 Januar 2023

B.Aadhar

# नवीन राष्ट्रीय शैक्षणिक धोरण : संधी आणी आव्हाणे

डॉ.सुखनंदन ढाले

राज्यशास्त्र विभागप्रमुख शिवाजी कॉलेज, हिंगोली

मो : ९८२२६९८८१८ Email id : dhalesu@gmail.com

संज्ञा : नवीन शैक्षणिक धोरण, 'उच्च शिक्षण, शिक्षण संकुल, पायाभूत सुविधा.

सारांश :

शिक्षण सर्वच पातळ्यांवर, विविध स्तरावर, विविध क्षेत्रातून बदलत आहे. काळाप्रमाणे जसा समाजात सामाजिक, सांस्कृतिक बदल होत असतो तसा शिक्षणातही बदल घडून येणे आवश्यक आहे. बदलत्या काळात फक्त पारंपरिक शिक्षण हे विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास व त्यांचे भावी जीवन सुकर करण्यासाठी उपयोगी पडणार नाही. त्यामुळे कौशल्यावर आधारित शिक्षणाला अनन्यसाधारण महत्त्व प्राप्त झाले आहे. कौशल्य आणि ज्ञान हे देशाच्या आर्थिक वाढीचा आणि सामाजिक विकासाची प्रेरक शक्ती आहेत. हे लक्षात घेउन शासनाने २९ जुलै २०२० मध्ये नवीन राष्ट्रीय शैक्षणिक धोरणाला मंजुरी दिली. इस्रोचे माजी प्रमुख के. कस्तुरीरंगन यांच्या अध्यक्षतेखाली ९ समितीय सदस्यांनी नवीन राष्ट्रीय शैक्षणिक धोरणाचा मसुदा तयार केला आहे. यानुसार शालेय व उच्च शिक्षणाची रचना अथवा आकृतीबंध आखण्यात आला आहे. विद्यार्थ्यांना शैक्षणिक प्रगती साधणे या सुधारित राष्ट्रीय धोरणाने शक्य होणार आहे. या धोरणात संशोधनावर जास्तीत जास्त भर देण्यात आले असून विद्यार्थ्यांची गुणवत्ता वाढविणे, त्यांचा सर्वांगीण विकास करणे, त्यांना स्वतःच्या पायावर उभे करणे, त्यांच्या आर्थिक विकासाला प्राधान्य देणे इत्यादी कार्यक्रम आखण्यात आले आहे.

उदेश :

1. नवीन शैक्षणिक धोरणातील महत्वाच्या तरतूदीचा अभ्यास करणे.
2. नवीन शैक्षणिक धोरणातील संधी जाणून घेणे
3. नवीन शैक्षणिक धोरणासमोरील आव्हानांचा अभ्यास करणे.

गृहीतके :

1. नवीन शैक्षणिक धोरणात अनेक महत्वाच्या तरतूदी आहेत.
2. नवीन शैक्षणिक धोरणामुळे नवीन संधी निर्माण झाल्या आहेत.
3. नवीन शैक्षणिक धोरणाच्या अमलबजावणी करतांना अनेक आव्हाने आहेत.

संशोधन पद्धत :

प्रस्तुत शोधनिबंध लेखनासाठी सामाजीक शास्त्रातील वर्णनात्मक व विश्लेपणात्मक पद्धतीचा उपयोग केला आहे. त्यात वापरलेली तथ्ये दुयम स्त्रोताकडून संकलीत केली आहेत

प्रस्तावना

देशाचे पहिले शैक्षणिक धोरण इंदिरा गांधी सरकारने 1968 मध्ये मांडले. हे शैक्षणिक धोरण 1964 च्या कोठारी आयोगाच्या शिफारशींवर आधारित होते. या शैक्षणिक धोरणानुसार १०+२+३ शैक्षणिक प्रणाली स्वीकारण्यात आलेली होती. यासोबत त्रिभाषा सूत्र अवलंबण्यात आलं होतं. यामध्ये प्रथम भाषा मातृभाषा, द्वितीय भाषा राष्ट्रभाषा (हिंदी), तृतीय भाषा म्हणून इंग्रजीचा स्वीकार करण्यात आलेला होता. सर्वसाधारणपणे याच शिफारशींवर आधारित 1986 मध्ये दुसरे शैक्षणिक धोरण राजीव गांधी सरकारने मांडले. या धोरणामध्ये "विशेषत

PRINCIPAL
Shivaji College
Hingoli. Dist. Hingoli

B.Aadhar' Peer-Reviewed & Refereed Indexed Multidisciplinary International Research Journal
Impact Factor -(SJIF) –8.575, Issue NO, (CCCLXXXVI) 386.-E
ISSN : 2278-9308
January, 2023

Shivaji College Hingoli Dist. Hingoli

भारतीय महिला, अनुसूचित जमाती आणि अनुसूचित जाती समुदायांसाठी असमानता दूर करण्यासाठी आणि शैक्षणिक संधी समान करण्यावर विशेष भर दिला गेला. या धोरणांमध्ये 1992 च्या नरसिंह राव सरकारने बदल सुचवला आणि काही सुधारणा करण्यात आल्या. 2015 मध्ये स्मृती इराणी मनुष्यबळ विकास मंत्री असतांना होत्या.त्यांनी नव्या शैक्षणिक सुधारणा मान्य करण्याच्या दृष्टिकोनातून ऑक्टोबर 2016 मध्ये धोरण मांडले. यावर जनतेकडून सुधारणा मागवण्यात आल्या. मात्र हे धोरण मंजूर होऊ शकले नाही. या धोरण निर्मितीचे प्रमुख टी. एस. आर. सुब्रमण्यम हे होते. नवीन राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२० (New National Education Policy 2020 ) धोरणासाठी पुन्हा दुसरा प्रयत्न माजी इस्त्रो अध्यक्ष के. कस्तुरीरंगन यांच्या अध्यक्षतेखाली कमिटी बनवून करण्यात आला.[1]

भारतातील शिक्षण प्रणाली

भारतीय राज्यघटनेच्या राज्य धोरणाची दिशादर्शक तत्त्वे (Directive principal of State Policy – DPSP) च्या भाग 4, कलम 45 आणि 39(एफ) मध्ये, राज्य मान्य आणि सर्वांना न्याय्य व प्रवेश-योग्य शिक्षणाची तरतूद आहे.[1] १९७६ च्या ४२ व्या घटनादुरुस्ती कायद्याने शिक्षणास राज्य यादीतून समवर्ती यादीमध्ये स्थानांतरित केले गेले. 2002 मधील 86 व्या घटनादुरुस्तीने मूलभूत अधिकारांच्या कलम 21-ए अंतर्गत शिक्षणाला अंमलबजावणीचा हक्क बनविला. ६ ते १४ वयोगटातील सर्व मुलांना प्राथमिक शिक्षण देण्यासाठी राईट टू एज्युकेशन (आरटीई), २००९ लागू करण्यात आले आहे.[2] या अधिनियमात सर्व शिक्षा अभियान, मध्यान्ह भोजन योजना, नवोदय विद्यालय, केंद्रीय विद्यालय यासारख्या सरकारी उपक्रमांत समाजातील वंचित घटकांसाठी 25% आरक्षण देण्यात आले आहे.

नवीन शैक्षणिक धोरणातील महत्वाचे मुद्दे

"भारताला जागतिक ज्ञान महासत्ता" बनविणे हे नवीन राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२० चे अंतिम उद्दीष्ट आहे. मनुष्यबळ विकास मंत्रालयाचे नाव बदलून शिक्षण मंत्रालय ठेवले गेले. 1947 मध्ये स्वातंत्र्य मिळाल्यापासून भारतातील शिक्षण प्रणालीतील हा तिसरा मोठा बदल आहे. एनईपी 2020 च्या पूर्वी 1968 आणि 1986 मध्ये शैक्षणिक यंत्रणेत सुधारणा झाली.शालेय शिक्षणातील गुंतवणुकीमध्ये लाक्षणिक वाढ करणे नवनवीन उपक्रम राबविणे.इसवी सन 2025 पर्यंतपाचवी व त्यापुढील इयत्तेतील प्रत्येक विद्यार्थ्यास पायाभूत साक्षरता व तंत्रज्ञान आत्मसात होत असल्याची दक्षता घेणे.शालेय शिक्षणासाठी ५+३+३+४ रचनेवर आधारित बौद्धिक विकास व अध्ययनाच्या तत्त्वांवर आधारित अभ्यासक्रम व अध्यापन शास्त्र रचना विकसित करण्यात आली आहे. विविध शाखांनी सुसज्ज असलेल्या उच्च शिक्षण संस्थांमध्ये स्तरानुसार व विषयवार राबवण्यात येणारा एकीकरण केलेला चार वर्षाचा बॅचलर ऑफ एज्युकेशन हा अभ्यासक्रम शिक्षकांना पूर्ण करणे गरजेचे आहे. शिक्षक होण्याचा हा प्रमुख मार्ग असेल. दुय्यम दर्जाच्या व अकार्यक्षम शिक्षक शिक्षण संस्था बंद करण्यात येतील. नवसंशोधनाच्या कल्पना वेगाने देशभर वितरित व्हाव्यात यासाठी नॅशनल रिसर्च फाउंडेशनची स्थापना करण्यात येईल. या धोरणाच्या माध्यमातून सर्वच भारतीय भाषांचे संवर्धन वृद्धी व चैतन्य अबाधीत राहील. राष्ट्रीय शिक्षण आयोग पंतप्रधानांच्या अध्यक्षतेखाली राष्ट्रीय शिक्षण आयोग किंवा नॅशनल एज्युकेशन कमिशन ची स्थापना करण्यात येईल. हा आयोग भारतातील शैक्षणिक दूरदृष्टीचा परिरक्षक असेल. सन 2030 पर्यंत पूर्व-शाळा ते माध्यमिक स्तरापर्यंतचे शिक्षण 100% ग्रॉस एनरोलमेंट रेश्यो (जीईआर) सह सार्वत्रिक केले गेले आहे.10 + 2 ची सद्य शिक्षण प्रणाली नवीन व सुधारित 5 + 3 + 3 + 4 रचनेद्वारे अनुक्रमे 3-8, 8 -11, 11-14, आणि 14 -18 वयोगटातील परस्पर बदलली जाईल. या प्रणालीमध्ये १२ वर्षांचे शिक्षण तीन वर्ष अंगणवाडी / पूर्व-शालेय शिक्षणासह असेल. दहावी आणि बारावीच्या बोर्ड परीक्षा अधिक सुलभ केल्या जातील आणि तथ्ये शिकण्याऐवजी मुख्य कार्यक्षमतेवर अधिक भर दिला जाईल. सर्व विद्यार्थ्यांना या परीक्षा दोनदा घेण्यास परवानगी दिली जाईल.शाळांमधील शैक्षणिक प्रवाह, अवांतर क्रिया आणि व्यावसायिक प्रवाह यांच्यात कोणतेही कठोर वेगळेपणा असणार नाही. इयत्ता सहावीपासून इंटर्नशिपसह व्यावसायिक शिक्षणाची तरतूद आहे.मातृभाषा / प्रादेशिक भाषा 8

PRINCIPAL
Shivaji College
Hingoli. Dist. Hingoli

B.Aadhar Peer-Reviewed & Refereed Indexed Multidisciplinary International Research Journal
Impact Factor -(SJIF) -8.575, Issue NO, (CCCLXXXVI) 386 -E
ISSN : 2278-9308 January 2023

बी.एड. पर्यंत शिक्षण ... साठी वापरली जाईल आणि कोणत्याही विद्यार्थ्यांवर कोणतीही भाषा कठोरपणे लादली जाणार नाही. शिक्षकांसाठी राष्ट्रीय शैक्षणिक अभ्यासक्रम (एनसीएफटीई) एनसीईआरटीशी सल्लामसलत करून राष्ट्रीय शिक्षक शिक्षण परिषद (एनसीटीई) द्वारा प्रोग्राम केले जाईल.4 वर्षे एकात्मिक बी.एड. 2030 पर्यंत पदवी अभ्यासक्रम अध्यापनासाठी किमान पदवी पात्रता असेल. अंडरग्रेजुएट कोर्स 3 ते 4 वर्षांच्या सर्वांगिक अभ्यासक्रमासह एकाधिक एक्झिट ऑप्शन्ससह आणि वेगवेगळ्या स्तरावर प्रमाणपत्रांसह दिले जातील. एम.फिल अभ्यासक्रम बंद केले जातील. वैद्यकीय आणि कायदेशीर शिक्षण वगळता संपूर्ण उच्च शिक्षणासाठी 'उच्च शिक्षण आयोग' Higher Education Commission of India' (HECI) (एचईसीआय) ची स्थापना करण्यात येणार आहे.[3] सार्वजनिक आणि खासगी दोन्ही उच्च शिक्षण संस्था समान निकषांद्वारे संचालित केल्या जातील. एचईसीआय मध्ये चार स्वतंत्र विभाग असतील उदा.

१) नियामक चौकटीची देखभाल करण्यासाठी राष्ट्रीय उच्च शिक्षण नियामक परिषद (एनएचईआरसी).
२) सर्वसाधारण शैक्षणिक परिषद (जीईसी) मानक सेटिंग्ज देखरेखीसाठी.
३) वित्तपुरवठा करण्यासाठी उच्च शिक्षण अनुदान परिषद (एचईजीसी).
४) अधिकृत मान्यता मिळवण्यासाठी नॅशनल क्रेडिटी कौन्सिल (एनएसी)[4]

१५ वर्षांत महाविद्यालयांची संलग्नता प्रणाली पुसून टाकली जाईल आणि महाविद्यालयांना श्रेणीबद्ध स्वायत्तता देण्याची यंत्रणा राबविली जाईल. भविष्यात प्रत्येक महाविद्यालयाचा स्वायत्त पदवी देणारा महाविद्यालय किंवा विद्यापीठाचा घटक म्हणून विकसित होणे अपेक्षित आहे.

नवीन शैक्षणिक धोरणातील संधी

नवीन शैक्षणिक धोरणात अभिमत विद्यापीठांचे, ऑटोनॉमस कॉलेजेसचे व खाजगी शिक्षण संस्थांचे योगदान खूप महत्त्वाचे असणार आहे. त्यांच्यासमोर नवनिर्मितीची आव्हाने आहेत. त्याचबरोबर तुलनेने कमी आर्थिक क्षमतेच्या इतर शाळा-कॉलेजेसना बरोबर घेऊन जाण्याचीही जबाबदारी आहे. शिक्षण संकुल ही अत्यंत महत्त्वाची संकल्पना नवीन शैक्षणिक धोरणात आहे. या शिक्षण संकुलाच्या केंद्रस्थानी सक्षम शाळा अथवा महाविद्यालय आहेत. या संस्थेच्या भोवती असलेल्या दहा ते पंधरा शाळांना अथवा महाविद्यालयांना सक्षम बनवणे, त्यांना आवश्यक त्या तांत्रिक सुविधा उपलब्ध करून देणे, तज्ज्ञ शिक्षकांचे मार्गदर्शन उपलब्ध करून देणे ही संकुलातील प्रमुख शाळा-महाविद्यालयाची जबाबदारी असणार आहे.[5] उदाहरणार्थ, क्रीडा, कला, संगीत यासारख्या विषयांना पुरेसे शिक्षक आजूबाजूच्या शाळांमध्ये असणार नाहीत. त्यांना तेवढ्या तज्ज्ञ व्यक्ती मिळणार नाहीत किंवा तेवढ्या व्यक्तींचे अनुदान शासन देऊ शकणार नाही. अशा वेळी संकुल केंद्रांमध्ये असलेल्या शाळेत हे तज्ज्ञ शिक्षक नेमले जावेत व त्यांचे वेळापत्रक अशा प्रकारे आखावे की एकतर जवळच्या शाळांतले विद्यार्थी मार्गदर्शन घेण्यासाठी या केंद्रीय शाळेत येतील किंवा या तज्ज्ञ शिक्षकांना आजूबाजूच्या शाळांमध्ये जाऊन त्यांच्या विषयांचे प्रशिक्षण देता येईल.

नवीन शैक्षणिक धोरणात व्यवसाय मार्गदर्शन हा विषय इयत्ता सहावीपासून जोडण्यात आला आहे. हे अत्यंत योग्य पाऊल आहे. परंतु अशा व्यवसायांचे प्रशिक्षण देण्याची यंत्रणा सर्व शाळांमध्ये उपलब्ध असणे कठीण आहे. या व्यवसाय प्रशिक्षणासाठी सक्षम प्रशिक्षक मिळणे, उत्तम दर्जाचे वर्कशॉप उपलब्ध होणे, व्यवसाय शिक्षण देण्यासाठी आवश्यक असलेली पायाभूत सुविधा उपलब्ध करून देणे हे प्रत्येक शाळेला शक्य होणार नाही. संकुल केंद्रातील शाळेने ही व्यवस्था करावी, अशी अपेक्षा आहे.[6] व्यवसाय प्रशिक्षणाचे उद्दिष्ट हेच आहे की विद्यार्थ्यांमध्ये स्वतःच्या पायावर उभे राहण्याचा आत्मविश्वास निर्माण व्हावा. या दृष्टीने हे अत्यंत क्रांतिकारक पाऊल आहे. परंतु याची अंमलबजावणी करताना केंद्रस्थानी असलेल्या शाळेने व तेथील व्यवस्थापनाने अधिक जबाबदारी उचलण्याची आवश्यकता आहे.

नववी ते बारावीमधील – म्हणजे ज्युनिअर कॉलेज स्तरातील विद्यार्थ्यांसाठी ही संकुल योजना अत्यंत महत्त्वाची ठरणार आहे. आज ज्युनिअर कॉलेजमध्ये काही ठरावीक सहा-सात विषय शिकवले जातात. आता प्रत्येक विद्यार्थ्याला वेगवेगळे विषय निवडण्याचे स्वातंत्र्य असणार आहे. तसे कला, वाणिज्य, विज्ञान, कायदा, तंत्रज्ञान, वैद्यकीय यासारखे विषय घेतील. चित्रकला, संगीत, नृत्य, आयुर्वेद, योग, इकॉलॉजी, मानसशास्त्र असे विविध



PRINCIPAL
Shivaji College
Hingoli, Dist. Hingoli

Shivaji College Hingoli Dist. Hingoli



…शास्त्र समावेश असेल. म्हणजे एकूण विषयांची व्याप्ती ३०-४०पेक्षा अधिक होऊ शकते.[7] कोणतेही एक कॉलेज इतक्या विषयांचे व्यवस्थापन करू शकणार नाही. या प्रसंगी संकुल व्यवस्थाच परिणामकारक ठरणार आहे. अधिक सक्षम असलेली कॉलेज किंवा संस्था यांनी पुढाकार घेऊन, संकुलातील इतर महाविद्यालयीन व्यवस्थापकांची चर्चा करून, अधिकाधिक कोणते विषय विद्यार्थ्यांना उपलब्ध करून देता येतील व त्यातल्या कोणत्या विषयांचे प्रशिक्षण कोणत्या महाविद्यालयाकडे देता येईल येईल याचे नियोजन करावे लागेल. संकुलातील कोणत्याही महाविद्यालयातील विद्यार्थी आपण जो विषय निवडला असेल त्या महाविद्यालयात त्या तासासाठी उपस्थित राहतील. यातून वेळापत्रकात थोडा विस्कळीतपणा येईल, पण विद्यार्थ्यांना निवड करण्याच्या अधिकाधिक संधी उपलब्ध होतील व त्यातून विद्यार्थ्यांचा व्यक्तिमत्त्व विकास अधिक चांगल्या प्रकारे होईल. या ज्युनियर कॉलेज गटातच भावी शिक्षणाची दिशा निश्चित होणार असल्यामुळे या ठिकाणी येणाऱ्या विद्यार्थ्यांचे प्रशिक्षण अधिक सक्षमतेने करणे हे मोठे आव्हान शिक्षण संस्थांसमोर असणार आहे.

शिक्षक प्रशिक्षणाची महाविद्यालये हे असेच एक मोठे आव्हान आहे. सामान्यतः अभिमत महाविद्यालयाने (ऑटोनॉमस कॉलेजेसनी) हा विषय घ्यावा अशी शासनाची अपेक्षा आहे. ज्या महाविद्यालयात अधिकाधिक विषय शिकविले जातात - म्हणजे जिथे हे शैक्षणिक विविधता आहे, तिथे हे महाविद्यालय जोडले जाऊ शकते. याचे कारण चार वर्षांच्या शिक्षक अभ्यासक्रमात विविध विषयांची प्राथमिक माहिती दिली जाईल, कौशल्य दिली जातील. त्याबरोबर एक विषय विशेष अभ्यासाचा म्हणून निवडावा लागेल. ज्युनिअर कॉलेजमध्ये अथवा महाविद्यालयात वेगवेगळे विषय शिकविले जाणे अपेक्षित आहे. त्या सर्व विषयांचे तज्ज्ञ शिक्षक या शिक्षक महाविद्यालयात तयार करावे लागतील. पूर्वी डी.एड. झालेला शिक्षक प्राथमिक शाळेत कुठलाही विषय शिकवत असे किंवा बी.एड. झालेला शिक्षक आपल्या एक किंवा दोन विषयांमध्ये नैपुण्य प्राप्त करून माध्यमिक शाळेत शिकवत असे. आता उच्च माध्यमिक व उच्च महाविद्यालयात विषयांची व्याप्ती पुष्कळ अधिक होणार आहे. शिक्षक महाविद्यालयांना पूर्वीच्या सहा-सात विषयांऐवजी आता तीस-चाळीस विषयांचे तज्ज्ञ शिक्षक तयार करावे लागतील. हे मोठे आव्हान असणार आहे. ग्रामीण व शहरी भागात कोठे कोणत्या विषयांचे शिक्षण दिले जाणार आहे, नेमके किती शिक्षक अपेक्षित आहेत हे निश्चित करून त्यानुसार त्या त्या विषयाच्या शिक्षकांची शाळा-महाविद्यालयात भरती करावी लागेल. त्या प्रमाणात शिक्षण महाविद्यालयातील प्रशिक्षणार्थी विद्यार्थिसंख्या निश्चित करावी लागेल. हे आव्हान पेरण्याची जबाबदारी तुलनेने अधिक सक्षम असलेल्या संस्थांना व महाविद्यालयांना उचलावी लागेल.

**नवीन शैक्षणिक धोरणासमोरील आव्हाने**

नव्या शैक्षणिक धोरणाच्या अंमलबजावणीने जरी जोर धरलेला असला तरीही ते पूर्णत्वाला जाण्याच्या मार्गावर अनंत आव्हाने आहेत. भारताच्या शैक्षणिक क्षेत्रातील विविधता आणि आकार लक्षात घेता या धोरणाची अंमलबजावणी हे एक अवघड काम असणार आहे. शालेय शिक्षण व्यवस्थेमध्ये १५ लाखाहून अधिक शाळा, २५ करोड विद्यार्थी आणि ८९ लाख शिक्षक आहेत. भारतातील शालेय शिक्षण व्यवस्था ही जगातील दुसऱ्या क्रमांकावरील शिक्षण व्यवस्था आहे. उच्च शिक्षण व्यवस्थेचा आकारही फार मोठा आहे.[8] एआयएसएचई २०१९ च्या अहवालानुसार, भारताच्या उच्च शिक्षण क्षेत्रात जवळपास १००० विद्यापीठे, ३९,९३१ महाविद्यालये आणि १०,७२५ स्वायत्त संस्थांमध्ये मिळून ३.७४ करोड विद्यार्थी शिक्षण घेत आहेत.[9] राज्य, जिल्हा तसेच तालुका स्तरावरील सर्व भागधारकांना एकत्र आणून या नव्या शैक्षणिक धोरणाची अंमलबजावणी करणे ही एक अत्यंत कठीण बाब ठरणार आहे. विलक्षण विविधता असलेल्या राज्यांमधील तसेच जिल्हास्तरावरील विविध भागधारकांमध्ये सामायिक जबाबदारी व मालकीची भावना निर्माण करणे हे शिक्षण मंत्रालयासाठी मोठे आव्हान असणार आहे. नव्या शैक्षणिक धोरणाची अंमलबजावणी देशांच्या, राज्यांच्या आणि सरकारांच्या क्षमतेवर अवलंबून आहे. भारताच्या शिक्षण व्यवस्थेमध्ये निधीची कमतरता आहे, संपूर्ण व्यवस्था ही नोकरशाहीवर आधारलेली आहे व नवीन कल्पना आणि वाढीच्या क्षमतेस शिक्षण व्यवस्थेत प्रतिकूल वातावरण आहे असे के. कस्तुरीरंगन यांच्या अध्यक्षतेखालील मसुदा समितीने निदर्शनास आणून दिले आहे. नव्या शैक्षणिक धोरणामध्ये कल्पना केलेल्या परिवर्तनांच्या विशालतेला चालना देण्यासाठी शिक्षण मंत्रालये (केंद्र आणि राज्ये) आणि इतर नियामक संस्थांमधील अंतर्गत क्षमता अत्यंत अपुरी आहेत. उदाहरणार्थ, पारंपरिक शिक्षणाकडून प्रयोगात्मक

PRINCIPAL
Shivaji College
Hingoli. Dist. Hingoli

B.Aadhar, Peer-Reviewed & Refereed Indexed Multidisciplinary International Research Journal
Impact Factor -(SJIF) –8.575, Issue NO, (CCCLXXXVI) 386 -E
ISSN : 2278-9308
January 2023

शिक्षण व टिका[illegible] विचारापर्यंत जाण्यासाठी ही शिक्षण व्यवस्था चालवणाऱ्या लोकांच्या व सोबतच शिक्षक, विद्यार्थी [illegible]लकांच्या दृष्टिकोनात बदल होणे गरजेचे आहे. याचा अर्थ असा की या मेगा उपक्रमाची अंमलबजावणी करण्यासाठी हजारो शाळा व महाविद्यालयांच्या क्षमता वाढीस व पुनर्निर्देशनास हातभार लावणे आवश्यक आहे. थोडक्यात, मंत्रालयाची विद्यमान संघटनात्मक रचना आणि प्रणालीमध्ये मोठ्या प्रमाणात फेरबदल करावे लागणार आहेत. नव्या शैक्षणिक धोरणाच्या दस्तऐवजामध्ये विद्यमान नियामक व्यवस्थेत सर्वसमावेशक व आमुलाग्र बदल घडवून आणण्याचा मार्ग आखण्यात आला आहे ही एक आशादायक बाब आहे. शिक्षण मंत्रालय सध्या भारत उच्च शिक्षण आयोगाच्या स्थापनेसाठी एक कायदा आणण्याच्या प्रयत्नात आहे. यूजीसी, एआयसीटीई आणि राष्ट्रीय शिक्षक प्रशिक्षण परिषदेच्या जागी भारत उच्च शिक्षण आयोग स्थापन करण्याचा विचारात सरकार आहे. हे धोरण मुख्यत्वे केंद्र आणि राज्यांमधील सहकार्यावर अवलंबून असणार आहे. या धोरणाचा मसुदा केंद्र सरकारने राज्य सरकारांसह विविध भागधारकांच्या योगदानातून तयार केला असला तरी त्याची अंमलबजावणी मुख्यत्वे राज्यांच्या सक्रिय सहकार्यावर अवलंबून आहे. याचे मुख्य कारण म्हणजे बहुतांश सेवांवर आधारित शैक्षणिक उपक्रम राज्य सरकारांकडून चालवले जातात. तामिळनाडू राज्याने नव्या शैक्षणिक धोरणाची अंमलबजावणी न करण्याची भूमिका अनुसरली आहे. अशीच भूमिका जर इतर राज्यांनीही घेतली तर केंद्राच्या चिंतेत वाढ होऊ शकते. त्यामुळे केंद्राकडून संघराज्याची समीकरणे कशाप्रकारे हाताळण्यात येत आहेत, यावर नव्या शैक्षणिक धोरणाचे भवितव्य ठरणार आहे.या धोरणाच्या दृष्टीने खाजगी क्षेत्राची भूमिका महत्त्वाची ठरणार आहे. भारतातील जवळपास ७० टक्के उच्च शिक्षण देणाऱ्या संस्था या खाजगी आहेत. तसेच एकूण संख्येच्या जवळपास ६० ते ७० टक्के विद्यार्थी खाजगी संस्थांमध्ये उच्च शिक्षण घेत आहेत.[10] खाजगी क्षेत्र आर्थिक संसाधने व नावीन्यपूर्ण कल्पना प्रदान करतात याकडे दुर्लक्ष करून चालणार नाही. या धोरणाच्या प्रक्रियेसाठी खाजगी क्षेत्राचे योगदान मिळवणे व यातील एक महत्त्वाचा भागीदार म्हणून खाजगी क्षेत्राच्या योगदानाला मान्यता देणे ही एक महत्त्वाची बाब आहे.

सर्वात महत्त्वाची गोष्ट म्हणजे विविध उपक्रमाच्या यशस्वी अंमलबजावणीसाठी येत्या दशकात पुरेल अशा संसाधनांची गरज लागणार आहे. या संदर्भात, या धोरणात म्हटल्याप्रमाणे नव्या धोरणाची उद्दिष्टे साध्य करण्यासाठी देशाला शिक्षणावरील सार्वजनिक खर्च एकूण देशांतर्गत उत्पन्नाच्या ६ टक्क्यांपर्यंत वाढवावा लागेल. भूतकाळात देण्यात आलेली आश्वासने आणि त्यांची प्रत्यक्ष पूर्तता यांचा विचार केल्यास हे नक्कीच कठीण काम असणार आहे. उदाहरणार्थ, १९६८च्या राष्ट्रीय शैक्षणिक धोरणामध्ये शिक्षणावरील सार्वजनिक खर्च एकूण देशांतर्गत उत्पन्नाच्या ६ टक्क्यांपर्यंत नेण्याची शिफारस करण्यात आली होती. मात्र, गेल्या चार दशकांमध्ये शिक्षणावरील सार्वजनिक खर्च ३ टक्क्यांच्या पुढे गेलेला नाही. आश्चर्यकारक बाब म्हणजे ज्या वर्षी हे नवे शैक्षणिक धोरण आले त्यावर्षी शिक्षणावरील खर्च हा सर्वात कमी होता. २०२०-२१मध्ये शिक्षणावरील खर्च ९९,३११ कोटींवरून २०२१-२२ मध्ये ९३,२२४ कोटी इतका कमी झाला.[11] कोरोना आणि आर्थिक संकटामुळे सरकारने आरोग्य क्षेत्रात अधिक खर्च करणे पसंत केले, त्यामुळे शिक्षण क्षेत्रावरील खर्चात कपात झाली याबाबत कोणतेही दुमत नाही. पण येत्या काळात शिक्षणावरील खर्च कसा वाढवता येईल यासाठी कोणतीही योजना सरकारकडे नाही.

निष्कर्ष :

1. नव्या शैक्षणिक धोरणानुसार शालेय अभ्यासक्रमात कृत्रिम बुद्धिमत्ता आणि आर्थिक बाबींचा समावेश करण्यात आला आहे.
2. नव्या आर्थिक धोरणामध्ये मातृभाषा किंवा प्रादेशिक भाषेला अधिक प्राधान्य देण्यात आले आहे.
3. शिक्षण मंत्रालयाने बहुचर्चित अॅकॅडेमिक बँक ऑफ क्रेडिट हा उपक्रम आणला आहे.
4. विविध उपक्रमांच्या अंमलबजवणीसाठी केंद्राला विकेंद्रीकरण आणि केंद्र- राज्ये यांच्यातील सहकार्य यांचा आधार घ्यावा लागणार आहे.
5. नव्या शैक्षणिक धोरणातील अनेक तरतुदींवर विरोधी पक्षांचे सरकार असलेल्या अनेक राज्यांनी आक्षेप नोंदवलेले आहेत.



PRINCIPAL
Shivaji College
Hingoli. Dist. Hingoli

Shivaji College Hingoli Dist. Hingoli

B.Aadhar' Peer-Reviewed & Refereed Indexed Multidisciplinary International Research Journal
Impact Factor -(SJIF) –8.575, Issue NO, (CCCLXXXVI) 386 -E
ISSN : 2278-9308
January, 2023

समारोप

नवे शैक्षणिक धोरण २०२० हा नक्कीच एक मार्गदर्शक दस्तऐवज आहे. नव्या युगातील नवी आव्हाने लक्षात घेता विविध शैक्षणिक गरजा, संरचनात्मक असमानता आणि विद्यार्थ्यांना भविष्यासाठी तयार करण्यामध्ये येणाऱ्या समस्यांचे निराकरण हे या धोरणाचे उद्दिष्ट आहे. यासोबतच शिक्षण व्यवस्थेतील अनेक संकटांना तोंड देण्याचे सर्वात आव्हानात्मक कार्यही या धोरणाद्वारे पूर्ण करायचे आहे. भारताच्या अफाट लोकसंख्येला शिक्षणाच्या मुख्य प्रवाहात आणणे आणि त्याद्वारे असंख्य रोजगाराच्या संधी निर्माण करणे हे या धोरणाच्या अंमलबजावणीवर ठरणार आहे. कोविड महामारीच्या काळात जलद पावले उचलून अवघड निर्णय घेऊन ते पूर्तीस नेण्याचे कौशल्य केंद्राने दाखवले आहे. याच कौशल्याचा फायदा शिक्षण क्षेत्रातही होणार आहे. नव्या शैक्षणिक धोरणाची अंमलबजावणी काही राज्यांनी केली आहे तर काही राज्ये त्या प्रक्रियेतून जात आहेत. तरीही अजून लांबचा पल्ला गाठायचा बाकी आहे. राज्य, जिल्हा, तालुका पातळीवरील विविध भागधारकांना तसेच खाजगी क्षेत्राला या धोरणाच्या अंमलबजावणीमध्ये सहभागी करून घेणे हे एक अवघड काम आहे. सोबतच क्षमता, आर्थिक संसाधने तसेच नवीन कल्पना निर्मितीसाठीच्या अनुकूल वातावरणाची कमतरता ही आव्हानेही समोर आहेत. परंतु या सर्वांमध्ये विविध राज्यांमध्ये जनमत तयार करणे हे सर्वात कठीण काम आहे. नव्या शैक्षणिक धोरणाच्या अंमलबजावणीचे यश सहकारी संघराज्य प्रणाली व सुधारणांमध्ये योगदान देण्याची राज्यांची क्षमता यांवर अवलंबून आहे.

संदर्भसुची :

1. राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२०, शिक्षण मंत्रालय,भारत सरकार,5
2. एम.लक्ष्मीकांत., इंडीयन पालीटी,के सागर,पब्लीकेशन्स,109
3. मोरे, डॉ.डी.एन., (2013) उच्च शिक्षण धोरण : आव्हाने आणि दिशा,द युनिक ± उडेशन,11
4. http://www.education.gov.in
5. राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२०, शिक्षण मंत्रालय,भारत सरकार,6
6. राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२०, शिक्षण मंत्रालय,भारत सरकार,7
7. राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२०, शिक्षण मंत्रालय,भारत सरकार,8
8. राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२०, शिक्षण मंत्रालय,भारत सरकार,9
9. http://mespune.in>nwes
10. http://www.esakal.com>kolhpur
11. http://maharashtratimes.com>article

PRINCIPAL
Shivaji College
Hingoli Dist. Hingoli